# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक ०९/०७/२०२३ (रविवार)

---

## क्रिकेट सटटयावर धाड........ एकुण ६१,००५/— रू चा मुद्देमाल जप्त
## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक ०८.०८.२३ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस स्टेशन सावनेर हददीत पेट्रोलिंग करीत असतांना गोपनिय खबरीकडुन माहीती मिळाली कि, तेलकामठी शिवारात एका फॉर्म हाउस वर बांग्लादेश अे अफगाणिस्तान यांचे मध्ये खेळल्या जात असलेल्या एक दिवशीय क्रिकेट सामन्यावर बेटींग (सट्टा) लावुन जुगार खेळत असल्याची माहीती मिळाली अश्या माहीती वरून लागलीच मदतीला पोलीस स्टेशन सावनेर स्टॉफ सोबत घेवुन मिळालेल्या माहीतीच्या ठिकाणी रेड केली असता इसम नामे १. दिपक शंकर गोस्वामी, वय ३४ वर्ष रा देवकृपा सोसायटी, वर्धमान नगर, नागपूर, २. कूणाल बबनराव धापोडकर वय ३४ वर्ष, रा मस्कासाथ ईतवारी, नागपूर हे बांग्लादेश अे अफगाणिस्तान यांचे मध्ये खेळल्या जात असलेल्या एक दिवसीय क्रिकेट सामन्यावर बेटींग (सट्टा) लावुन जुगार खेळत असतांना यांच्या कडुन जुगार खेळतांना चे साहीत्य मिळुन आले.

**१० मोबाईल संच कि ४६,०००/—रू, एक मोबाईल टॅब कि ११,०००/—रू, ईतर साहीत्य कि ४००५/— रू असा एकुण ६१,००५/—रू चा मुद्देमाल जप्त करून ताब्यात घेवुन पुढील कायदेशीर प्रक्रीयेकरीता पोलीस स्टेशन सावनेर यांच्या ताब्यात देण्यात आले.**

सदरची कारवाई ही पोलीस अधिक्षक श्री विशाल आंनद, अपर पोलीस अधिक्षक श्री संदीप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, आशिषसिंग ठाकुर, सफौ चंद्रशेखर गडेकर, पोहवा. राजेंद्र रेवतकर, अमोल कुथे, पोना किशोर वानखेडे, आशिष मुंगले, उमेश फुलबेल, पोशि राहुल साबळे, तसेच पोलीस स्टेशन सावनेर चे पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, सफौ गणेश राय, पोना रवि मेश्राम, पोशि सचिन लोणारे यांनी संयूक्तरित्या पार पाडली.

सदर बातमीचा फोटो सोबत जोडलेला आहे.

<u>घरफोडी</u>

**पोलीस स्टेशन पारशिवनी :–** अंतर्गत मौजा करंभाड शिवार पाईपलाईन रोड ०४ कि.मी. पश्चिम, येथे यातील फिर्यादी यांची मौजा करंभाड शिवारात शेत सर्व्हे नं. ३९९ पाईप लाईन रोडवर एकूण सव्वापाच एकर शेती असुन सामान ठेवण्याकरीता फिर्यादीने शेतात खोली बांधलेली असुन त्या खोलीमधील १) एक पाण्याची ३ एच.पी. मोटार जुनी वापरती कि. ५,०००/–रू. २) ४ रासायनिक खताच्या बॅग कि. १,४००/–रू प्रमाणे कि.५,६००/–रू ३) कॉपर केबल अंदाजे १०० मिटर कि. १,५००/–रू.चा एकूण कि. १२,१००/–रू चा माल फिर्यादीचे शेतातील खोलीचे दाराचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून तसेच विज महा. वितरण कंपनीचे २००० मिटर अॅल्युमिनीयमचा तार कि. ६२,००० /–रू.चा माल असा एकूण ७४,१०० /–रू चा माल दि. ०७/०७/२३ चे १८/०० ते दि. ०८/०७/२३ चे ०८/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले. तसेच ६ सिमेंटचे इलेक्ट्रीक पोल पाडुन किं. १४,००० /–रू नुकसान केले आहे

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सुभाष महादेवराव पाटील वय ४५ वर्षे रा. प्रभाग क्र. १२ तकिया मोरोती चा मागे पारशिवनी जि. नागपुर यांचे रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५७, ३८०, ३७९, ४२७ भादवी. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास – पो हवा. उईके मो.क्र. ९३७३६५१४७१हे करीत आहे.

<u>दुखापत</u>

**पोलीस स्टेशन काटोल :–** अंतर्गत पेठबुधवार काटोल ०१ किमी प., येथे दिनांक ०८/०७/२३ चे १०/५५ ते ११/०० वा दरम्यान, यातील आरोपी क्र. १ व २ हिचे मुलीचे सोबत फिर्यादी याचे प्रेमसंबध असल्याचे कारनावरून आरोपी क्र. २ हिने फिर्यादीस स्वताचे घरी बोलाउन आरोपी क्र. १ व ३ यांनी फिर्यादीस लाकडी दांड्याने फिर्यादीचे दोन्ही हातावर, पायावर, नाकावर, तसेच डोक्यावर मारून जखमी केले व शिवीगाळी करून मारन्याची धमकी दिली

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजीक अलताफ शेख वय २३ वर्ष रा.पेठबुधवार काटोल मो. ७२१८३५३११८ यांचे रिपोर्टवरून पोस्टे काटोल येथे आरोपी नामे १) युनुस शेख २) लायका शेख ३) वैभव उर्फ दादु सातपुते तीन्ही रा.पेठबुधवार काटोल यांचेविरूध्द कलम ३२४, ५०४,५०६, ३४ भादवि अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ रूढे मो क्र ९९२३३५२६४६ करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१.पोलीस स्टेशन सावनेर :–** अंतर्गत मालू पेपरमील मौजा माळेगाव ०३ किमी पूर्व. येथे दिनांक ०७/०७/२३ चे २१/३० वा ते २२/०० वा दरम्यान, यातील फिर्यादीचे वडील सत्यपाल दुपारे यांनी आपली मोटर सायकल वर चंदन नाहरकर व सूंदर यदूवंशी (मजूर) यांना सावनेर वरून बसवून माळेगाव येथे सोंडून माळेगाव वरून परत पटकाखेडी येथे येत असता, मालू पेपरमील जवळ त्याचे समोरून चूकीचे दिशेने येणा–या अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचे बाबाचे मोटर सायकल ला समोरून धडक देवून त्यांचा अपघात करून त्यांचे मरणास कारणीभूत झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अशोक सत्यशील दूपारे वय २३ वर्षे रा पटकाखेडी सावनेर यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे अज्ञात मोटर सायकल चालक आरोपीविरूध्द कलम २७९,३०४(अ) भादवी सह कलम १८४,१३४(ब),१२२/१७७ मोवाका चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास – पोहवा राजेश हावरे ब न १५४६ मो क्र ९९२३३६५६२२ हे करीत आहे.

**२.पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** अंतर्गत मौजा ब्राम्हणी बायपास कळमेश्वर ३ किमी पश्चिम. येथे दिनांक ०८/०७/२३ चे १९/०० ते १९/३० वा दरम्यान, यातील मृतक मुलगा नामे अथर्व सचिन हीवराडे वय ७ वर्ष रा. वार्ड क्र. २ ब्राम्हणी कळमेश्वर हा आपल्या घरासमोर खेळत असता यातील आरोपी मो. सा. क्र. एमएच ४० सीएल ८६४० चा चालक आरोपी नामे– भुषण राजेंद्र चांभारे रा. घोराड कळमेश्वर त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकला गंभीर जखमी करून मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राहुल शंकरराव हीवराडे वय ३७ वर्ष रा वार्ड क्र. ३ ब्राम्हणी फाटा कळमेश्वर यांचे रिपोर्टवरून पोस्टे कळमेश्वर येथे नमुद आरोपीविरूध्द कलम २७९,३३६,३३७,३०४ (अ) भादवी १८४ मोवाका चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास – जीपीएसआय बारई हे करीत आहे.

**पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे**
**मो क्र ९४२२६१४६३३**
**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**